**आयुक्त, राज्य कामगार विमा योजना**

महाराष्ट्र राज्य

६ वा मजला, पंचदीप भवन, ना.म. जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई -४०००१३

**क्ष- किरण तंत्रज्ञ, क्ष-किरण सहाय्यक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहाय्यक, व्यवसायोपचारतज्ज्ञ, भौतिकोपचार तज्ञ, आहारतज्ञ, हृदयस्पंदन आलेख तंत्रज्ञ, मिश्रक, परिचारिका-गट-क पदाची सरळसेवा भरती**

राज्य कामगार विमा योजनेमधील गट-क संवर्गातील **क्ष- किरण तंत्रज्ञ, क्ष-किरण सहाय्यक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहाय्यक, व्यवसायोपचार तज्ञ, भौतिकोपचार तज्ञ, आहारतज्ञ, हृदयस्पंदन आलेख तंत्रज्ञ, मिश्रक, परिचारिका** या पदांकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन (Online) पद्धतीनेअर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना महाऑनलाईनच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

वर नमूद केलेल्या पदांचा अनुशेष, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन भरावयाच्या पदांचा तपशील, त्यांची वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

## १) क्ष- किरण तंत्रज्ञ

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ११

ब) **वेतनश्रेणी** - रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु. ४२००/-

क) **शैक्षणिक अर्हता** - बी.एस.सी. (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र या विषयांसह)

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्ष-किरण तंत्रज्ञ | **१** | **१** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **२** | **६** | **११** |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **क्ष-किरण तंत्रज्ञ** | महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ३ |
| | माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | सर्वसाधारण | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ३ | ७ |
| | **एकूण** | **१** | **१** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **२** | **६** | **११** |

## २) क्ष-किरण सहाय्यक

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ०६

ब) **वेतनश्रेणी** - रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.२०००/-

क) **शैक्षणिक अर्हता** - एस.एस.सी.

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्ष-किरण सहाय्यक | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ६ |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्ष-किरण सहाय्यक | महिला ३०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | सर्वसाधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ |
| | **एकूण** | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **२** | **६** |

## ३) प्रयोगशाळा तंत्रज्ञ

अ) **भरावयाची रिक्त पदे** - १२

ब) **वेतनश्रेणी** - रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४२००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : १) बी.एस.सी. (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र या विषयांसह)

२) हाफकिन संस्थेचे डी.एम.एल.टी. पदवीधारकास प्राधान्य.

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ७ | १२ |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | महिला ३०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| | माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | सर्वसाधारण | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | २ | ६ |
| | **एकूण** | **२** | **१** | **०** | **१** | **०** | **०** | **१** | **०** | **७** | **१२** |

## ४) प्रयोगशाळा सहाय्यक

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ११

ब) **वेतनश्रेणी** - रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु.२०००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : एस.एस.सी.

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रयोगशाळा सहाय्यक | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **३** | **५** | **११** |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रयोगशाळा सहाय्यक | महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ३ |
| | माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | २ | ७ |
| **एकूण** | | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **३** | **५** | **११** |

## ५) व्यवसायोपचार तज्ञ

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ०५

ब) **वेतनश्रेणी** - रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४३००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : व्यवसायोपचार या विषयातील पदवी (B.O.T.)

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **व्यवसायोपचार तज्ञ** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **५** |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यवसायोपचार तज्ञ | महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ४ |
| | **एकूण** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **५** |

## ६) भौतिकोपचार तज्ञ

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ०६

ब) **वेतनश्रेणी** - रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४३००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : भौतिकोपचार या विषयातील पदवी (B.P.T.)

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भौतिकोपचार तज्ञ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ६ |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भौतिकोपचार तज्ञ | महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | सर्वसाधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ५ |
| | **एकूण** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **३** | **६** |

## ७) आहारतज्ञ

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ०८

ब) **वेतनश्रेणी** - रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४३००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : बी.एस.सी. (Home Science)

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आहारतज्ञ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ३ | ८ |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आहारतज्ञ | महिला ३०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | २ | ६ |
| | **एकूण** | **२** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **३** | **८** |

## ८) <u>हृदयस्पंदन आलेख तंत्रज्ञ</u>

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ०९

ब) **वेतनश्रेणी** - रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु. ४२००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : एस.एस.सी. किंवा तत्सम

ड) **अनुभव** - रुग्णालयात ई.सी.जी. मशीन हाताळल्याचे ६ महिन्याचे अनुभव प्रमाणपत्र.

| **पदनाम** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हृदयस्पंदन आलेख तंत्रज्ञ | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **४** | **९** |

| **पदनाम** | | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हृदय स्पंदन आलेख तंत्रज्ञ | महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| | माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | २ | ६ |
| | **एकूण** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **४** | **९** |

## ९) <u>मिश्रक / औषध निर्माता</u>

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ८३

ब) **वेतनश्रेणी** - रु. ५२००-२०२००, ग्रेड पे रु. २८००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : १) एस.एस.सी. किंवा तत्सम

२) बीफार्म मध्ये पदवी किंवा पदविका.

३) महाराष्ट्र राज्य औषध निर्माण परिषद (Maharashtra State Pharmacy Council) यांचे नोंदणी प्रमाणपत्र अथवा भारतीय औषध निर्माण संस्था, महाराष्ट्र शासन शाखा (Indian Pharmaceutical Association, Maharashtra Branch) यांचे मिश्रक / औषध निर्माता प्रशिक्षण प्रमाणपत्र.

| **पदनाम** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मिश्रक/औषध निर्माता** | **११** | **६** | **३** | **०** | **४** | **३** | **०** | **३** | **५३** | **८३** |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मिश्रक/ औषध निर्माता | महिला ३०% | ३ | २ | १ | ० | १ | १ | ० | १ | १६ | २५ |
| | अपंग ३% कर्णबधिर/अस्थिव्यंग (एक हात + एक पाय बाधित) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| | माजी सैनिक १५% | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ८ | १२ |
| | प्रकल्पग्रस्त ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४ |
| | भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | खेळाडू ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४ |
| | सर्वसाधारण | ४ | ३ | २ | ० | २ | २ | ० | २ | २० | ३५ |
| | **एकूण** | **११** | **६** | **३** | **०** | **४** | **३** | **०** | **३** | **५३** | **८३** |

## १०) परिचारिका

अ) **भरावयाची रिक्त पदे** - ५८२

ब) **वेतनश्रेणी** - रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु.४२००/-

क) **शैक्षणिक अर्हता** : १) महाराष्ट्र नर्सिंग अॅण्ड मिडवायफरी कोर्स (G.N.M) किंवा बी.एस.सी. (नर्सिंग)

२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र.

| पदनाम | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परिचारिका | **७६** | **४१** | **१७** | **१०** | **२०** | **१२** | **१२** | **११०** | **२८४** | **५८२** |

| पदनाम | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परिचारिका | महिला ३०% | २३ | १२ | ५ | ३ | ६ | ४ | ४ | ३३ | ८५ | १७५ |
| | अपंग ३% अल्पदृष्टी/अस्थिव्यंग (एक पाय बाधित) | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | ३ | ९ | १७ |
| | माजी सैनिक १५% | ११ | ६ | ३ | २ | ३ | २ | २ | १७ | ४३ | ८७ |
| | प्रकल्पग्रस्त ५% | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ६ | १४ | ३१ |
| | भूकंपग्रस्त २% | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ६ | ११ |
| | खेळाडू ५% | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ६ | १४ | ३१ |
| | सर्वसाधारण | ३० | १७ | ६ | ३ | ८ | ४ | ४ | ४३ | ११३ | २२८ |
| | **एकूण** | **७६** | **४१** | **१७** | **१०** | **२०** | **१२** | **१२** | **११०** | **२८४** | **५८२** |

**वरील सर्व पदांकरीता वयोमर्यादा :**

दिनांक ३१/८/२०१७ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षांपेक्षा कमी व ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

**टिप :** १) मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.

२) अपंग उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

३) माझी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षाची राहील.

४) प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रकल्प/१००६/ मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि.०३.०२.२००७ नुसार खुल्या व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे राहील.

**सर्वसाधारण अटी :-**

१. जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत / आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

२. जाहिरातीतील नमूद केलेल्या पदांसाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा. संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवाराने ऑनलॉईन पध्दतीने अर्ज भरताना अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच तसेच शैक्षणिक पात्रता पूर्ततेच्या अधीन राहून उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय निवड केली जाईल.

३. शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत दिलेल्या सुचनेनुसार विहित मुदतीत अर्ज सादर करावा.

४. महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्येमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

**मागासवर्गाचे आरक्षणासंबंधी अटी / नियम :-**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्ती जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे.

८...

उपरोक्त अधिनियमानुसार आरक्षणासंबंधीच्या तरतुदी लागू होतील.

१. वरील अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग यांना उन्नत / प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

२. मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता संबंधित जात वैधता समितीस आवश्यक ते दस्तऐवज सादर केल्याची पोचपावती सादर केल्यानंतरच **तात्पुरत्या** स्वरुपाची नियुक्ती देण्यात येईल. **जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी निवड झालेल्या उमेदवारांची जबाबदारी राहील.**

३. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

४. मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.

५. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व अर्जात भरलेली माहिती सिद्ध करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे जसे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, कायमस्वरुपी अपंग असल्याचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू प्रमाणपत्र, माजी सैनिक कार्यमुक्त प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र इत्यादी सर्व जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी वैध असणे आवश्यक आहे. जे उमेदवार जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत प्राप्त व वैध प्रमाणपत्र धारण करणार नाहीत त्यांचे अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

**समांतर आरक्षणासंबंधीचे अटी / नियम:-**

१. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.८२/२००१/मसंआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.०५.२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. (महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी

पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे). (अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील महिला वगळून)

२. अपंग प्रवर्गासाठी एक हात व एक पाय बाधित, अल्पदृष्टी व कर्णबधीर याकरीता एकूण ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यापेक्षा कमी अपंगत्व नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार नवी दिल्ली क्र.३६०३५/३/२००४ ईएसटीटी (आरईएस), दि.२९/१२/२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि..०७.०६.२००६ अनुसार निवडीस / नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. ज्या अपंग उमेदवारांजवळ कायमस्वरुपी अपंग असल्याचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी वैध असलेले प्रमाणपत्र उपलब्ध असेल, अशाच अपंग उमेदवारांनी अपंग आरक्षणांतर्गत अर्ज सादर करावा.

३. माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नांव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही याची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) असणे आवश्यक आहे.

४. अ) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना ५% आरक्षण राहिल.

ब) प्रकल्पग्रस्त म्हणून अर्ज करणा-या उमेदवाराकडे महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१/०१/१९८० नुसार विहित नमुन्यात प्रकल्पग्रस्तांचे प्राधान्यक्रम दाखला (प्रपत्र) असणे अत्यावश्यक आहे.

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक भूकंप -१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि.२७/०८/२००९ मधील तरतुदीनुसार भूकंपग्रस्त व्यक्तींसाठी २ टक्के समांतर आरक्षण राहील. शासन निर्णय, वन व महसूल विभाग क्रमांक इक्यूआर-१०९४/प्र.क्र.७६८/भूपूक-१, दिनांक ९/८/१९९५ नुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रमाणित केलेला भूकंपग्रस्त असल्याचा दाखला/प्रमाणपत्र सादर करणे अत्यावश्यक आहे.

६. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी महाराष्ट्र शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. ३०.०४.२००५ अनुसार ५ % आरक्षण राहील. खेळाडू

आरक्षणांतर्गत केवळ राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेल्या अथवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत.

**<u>महत्वाच्या सूचना :</u>**

१. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा. उमेदवारांनी त्यांचा ई-मेल आय-डी व मोबाईल नंबर भरती - प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवणे, ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी आहे. उमेदवाराचा ई-मेल आयडी व मोबाईल नंबर बंद झाल्यास अथवा बदलला गेल्यास उमेदवारास मेल अथवा संदेश प्राप्त न झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. या संदर्भातील अधिक माहिती महाऑनलाईनच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

३. अ) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे व अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने ती सिद्ध करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे ही पडताळणीवेळी सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा. अचूक अर्ज भरण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

ब) उमेदवाराने अर्जात अचूक माहिती भरणे ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. एकदा भरलेली माहिती उदा. जात, धर्म, प्रकल्पग्रस्त, खेळाडू, भूकंपग्रस्त, महिला आरक्षण, माजी सैनिक, अपंग इत्यादी बाबतीत भविष्यात कोणताही बदलासंबंधित अर्ज स्विकारला जाणार नाही किंवा तसा कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४. उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. ऑनलाईन अर्ज स्विकृत करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. परंतु एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर कोणत्याही प्रकारचा बदल उमेदवारास करता येणार नाही व शेवटी भरलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील व अर्ज योग्य पद्धतीने भरला आहे याची खात्री करावी. अर्जाची प्रत स्वत:जवळ तयार ठेवावी व अंतिम निवडीपूर्व अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी मागितली जातील त्यावेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

६. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रत ही उमेदवारांनी पद भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत:जवळ बाळगणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. ऑनलाईन अर्जाची प्रत हरविल्यास, गहाळ झाल्यास त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

७. ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास त्यासंबंधीची माहिती maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या जाहिरातीच्या Login पेजवर " Frequently ask question" अंतर्गत उपलब्ध ई-मेल आयडीवर नोंदवावी.

**उमेदवारांना इतर महत्वाच्या सूचना :**

१. शासकिय, निमशासकिय, शासकीय उपक्रम सेवेतील कर्मचा-याने वर नमूद केलेल्या पदांकरिता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचा-याला सक्षम अधिका-याने वितरीत केलेले खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

२. पदासाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व ऑनलाईन परिक्षेस पात्र ठरणा-याउमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती महाऑनलाईनच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. माजी सैनिक (Ex-Serviceman) उमेदवारांनी त्यांचे व्यवसाय (Trade) प्रमाणपत्र हे जाहिरातीत शैक्षणिक अर्हतेमध्ये दर्शविण्यात आलेल्या कोणाही एका व्यवसायाशी (Trade) समतुल्य असल्याबाबतचे प्रमाणत्र जिल्हा सैनिक बोर्डाकडुन घेवून अंतिम निवड प्रक्रियेवेळी सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

४. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. **भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही, तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही.** उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय तसेच अन्य कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१२...

५. उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल.

६. परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये किंवा परिक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

७. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

८. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान पूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

९. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. तसेच उमेदवाराजवळ महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे स्वत:च्या नावे असलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी वैध असलेले उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१०. अ) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग या मागासप्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी वैध असलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

ब) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी वैध असलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळून इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना कामावर रुजू होण्यापूर्वीच सर्व कागदपत्रे प्रस्तावासह जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करुन ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधित उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथा सदर उमेदवारांची राज्य कामगार विमा योजनेतील सेवा समाप्त करण्यात येईल.

१२. ऑनलाईन परिक्षेतील गुणानुक्रमे निवडीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना मागणी केल्यानुसार

कागदपत्रे तपासणीवेळी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, अनुभव, समांतर आरक्षणासंबंधीची कागदपत्रे, अधिवास (डोमीसाईल), विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना-हरकत प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी जे-जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रत व ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिद्ध करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) या स्व-साक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१३. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना उपलब्ध रिक्त जागा व आवश्यकतेनुसार राज्य कामगार विमा योजनेतील रुग्णालये/कार्यालयांमध्ये नेमणूका देण्यात येतील.

१४. सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार **आयुक्त, राज्य कामगार विमा योजना** राखून ठेवत आहे.

१५. अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरिता लागू असलेली सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्रे व ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिद्ध करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक ३१/८/२०१७ रोजी वैध असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज स्विकृत (Submit) करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. तदनंतर एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर उमेदवाराची कोणतीही दुरुस्ती विचारात घेतली जाणार नाही. सदर बाबतीत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

**अर्ज करण्याची पद्धत :**

१. उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व माहिती महाऑनलाईनच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वर दर्शविलेल्या लिंकवर ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. (Guidelines for online application are available on the link above.) त्यानुसार उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. उमेदवार परिक्षा शुल्क भरण्यासाठी Net Banking/क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड या सुविधा वापरुन

परिक्षा शुल्क भरु शकतील. उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परिक्षा शुल्क उपरोक्त पद्धतीद्वारे भरावयाचे आहे. अपंग आणि माजी सैनिक उमेदवारांकरीता सदर फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| खुल्या प्रवर्गातील उमेदवार | : | रुपये ८००/- |
| मागासवर्गीय उमेदवार | : | रुपये ४००/- |

३. विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज महाऑनलाईनच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७/८/२०१७ पासून उपलब्ध राहील. सदर अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक ३१/०८/२०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंतच राहील. उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

४. अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील व ती सिद्ध करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती/ विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५. ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर दाखला, अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, खेळाची प्रमाणपत्रे, प्रकल्पग्रस्ताचा दाखला, भूकंपग्रस्त दाखला, माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित केलेल्या प्रती सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत मागणी केल्यानंतर देणे क्रमप्राप्त आहे.

६. अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

७. शासकीय / निमशासकीय महामंडळ कार्यालयतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्जासोबत कार्यरत कार्यालयातून नियुक्ती प्राधिका-याने स्वसाक्षांकीत केलेली **' ना हरकत प्रमाणपत्राची '** प्रत अर्जासोबत जोडावी.

**<u>निवड पद्धती :</u>**

१. जाहिरातीस अनुसरुन पात्र झालेल्या अर्जदारांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

२. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच जाहिरातीमध्ये दर्शविण्यात

आलेल्या रिक्त जागांनुसार सामाजिक आणि समांतर आरक्षण विचारात घेऊन निवडसूची यादी तयार करण्यात येईल. सदरची निवडसूची महाऑनलाईनच्या maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. उमेदवारांची ज्येष्ठता ही त्यांना ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांस अनुसरुन निश्चित करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. उमेदवारांकडून मागणी केल्यानंतर सादर केलेल्या अर्जाची सविस्तर छाननी निवडसूची बनविते वेळी केली जाईल. अर्जामध्ये दर्शविलेल्या माहिती पृष्ट्यर्थ योग्य ते दस्तऐवज जमा करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील, अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

५. उमेदवाराने एकापेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास आणि त्यामधील जातीचा प्रवर्ग व अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंदी रद्दबातल समजल्या जातील.

६. निवडसूची बनवितांना ज्या उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील जेष्ठताक्रम ठरविण्यात येईल.

७. निवड झालेल्या उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारिरीक बाधित/व्यंगत्वाचे प्रमाण, माझी सैनिक, भूकंपग्रस्त इत्यादी सिद्ध करणे हे सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहिल. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिद्ध करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल. तसेच सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

८. दस्तऐवज सादर करण्याच्या कालावधीमध्ये उमेदवाराने दस्तऐवज सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**<u>महत्वाच्या तारखा :</u>**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि. १७.०८.२०१७ ते दि. ३१.०८.२०१७ |
| Net Banking द्वारे फी भरण्याचा कालावधी | दि. १७.०८.२०१७ ते दि. ३१.०८.२०१७ |
| बँकेच्या चलनाद्वारे फी भरण्याचा कालावधी | दि. १७.०८.२०१७ ते दि. ०१.०९.२०१७ |
| ऑनलाईन परिक्षेची तारीख | अंदाजे माहे सप्टेंबर २०१७ चा शेवटचा आठवडा |
| तक्रार असल्यास संपर्क क्रमांक | ०२२-६१३१६४०३ / २४९५०८४७ |
| ई-मेल आयडी | mr.support@mahaonline.gov.in |